---

## * प्र क र ण – 2 रे *

---

**'आचार्य अत्रे यांचा परिचय : वाङ्मयीन कर्तृत्व :**
**आचार्य अत्रे यांचे बहुरंगी व्यक्तिमत्त्व यांचा स्थूल परिचय :**
**आचार्य अत्रे यांच्या मृत्युलेख लेखनामागील प्रेरणा'**

**आचार्य अत्रे यांचा परिचय –**

आचार्य प्रल्हाद केशव अत्रे हे नाव अवघ्या महाराष्ट्राला सुपरिचित आहे. मोठया धुंदीने अत्र्यांनी उभ्या जीवनात आयुष्याचा आनंद लुटला. आयुष्यात जे जे करावे वाटले ते ते त्यांनी केले आणि जेंव्हा सोडून द्यावे वाटले तेंव्हा सोडूनही दिले. त्यांच्या जीवनात अनेक योगायोग आले पण सर्वच गोष्टी योगायोगाने झाल्या असे म्हणता येणार नाही. कारण त्यांच्या जीवनात जरी भरपूर योगायोग आले असले तरी त्यांचा योग्य लाभ उठवणे हे त्यांचेच कर्तृत्व होय.

अत्रे ज्या ज्या क्षेत्रात गेले तेथे तेथे त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. कुठे जायचे ? काय करायचे ? हे न ठरवताच त्यांनी बरेचसे उद्योग केले. "आयुष्यात कुठे जायचे हे कळत नाही. हीच तर त्याची गंमत आहे. आगगाडीच्या वेळापत्रकासारखे जीवनाचे वेळापत्रक जन्मल्याबरोबर प्रत्येकाच्या हाती पडण्याची सोय असती म्हणजे कोणत्या गाडीने कुठल्या स्टेशनला जायचे हे प्रत्येकाला बरोबर कळले असते. पण तसे नाही म्हणून तर घोटाळा उडतो. आयुष्याच्या गाडीत बसलेल्या माणसांना कुठे उतरायचे हे शेवटपर्यंत समजत नाही. काही माणसे प्रवासाला कंटाळून अधल्यामधल्या स्टेशनावरच उतरतात. अन् आयुष्यभर तेथेच मुक्काम करुन बसतात. त्यांची जगात फार वाहवा होते. पण ज्यांचा प्रवास शेवटपर्यंत संपत नाही, ती माझ्यासारखी माणसे वेडी ठरतात"[1] अत्र्यांनी जसे वर्णिले आहे तसेच अत्र्यांचे जीवन आहे. त्यांनी जीवनात अनेक उद्योग केले. कोणतीही गोष्ट त्यांनी करायची म्हणून ठरवून केली नाही. ब–याच गोष्टी त्यांच्याकडे चालत आल्या आणि त्यांनी ती ती आव्हाने स्वीकारली. ते कवी होते. शिक्षक होते, शिक्षण तज्ज्ञ होते, विडंबनकार होते. नाटककार होते. चित्रपटकार होते, कथाकार होते, कादंबरीकार होते, पट्टीचे वक्ते होते, राजकारणी होते, पत्रकार होते अशी अनेक क्षेत्रे त्यांनी पादाक्रांत केली.

*** अत्र्यांचा जन्म, घराणे व अत्र्यांवरील लहानपणाचे संस्कार –**

अत्र्यांचा जन्म 13 ऑगस्ट 1898 रोजी सासवड येथे झाला. "अत्रे घराण्याचे मूळ संस्थापक राघो बल्लाळ अत्रे हे होत. राघो बल्लाळ अत्रे हे शिवाजी महाराजांच्या घोडदळाचे 'सुभे' म्हणजे प्रमुख होते."[2] अशा इतिहासकालीन घराण्यात अत्र्यांचा जन्म झाला. "मौजे गराडे आणि आणखी सातगावे त्यांचे जोशीपण आणि कुलकर्णीपण अत्रे घराण्याकडेच होते. ह्या सात गावांपैकी कोंढित हे एक गांव. नशीब काढण्याच्या ईर्षेने अत्र्यांचे वडील केशव विनायक हे पहिल्यांदा गावाबहेर पडले आणि सासवडला आले. अत्र्यांचे वडील स्वभावाने रुक्ष व अतिशय कडक होते. त्यांनी सासवड म्युनिसिपालिटी' चे सेक्रेटरी म्हणून महिना पंधरा रुपये पगारावर काम केले. 'सासवड न्यू इंग्लिश स्कूल' ही शाळा काढून पाहिली पण त्यात त्यांना यश आले नाही. तसेच त्यांनी 'व्ही. एल. ॲण्ड सन्स' या नावाने निळया शाईच्या पुडया तयार करण्याचा उद्योगही केला. मात्र त्यांच्या जीवनाला सासवड म्युनिसिपालिटीचे सेक्रेटरी झाल्यापासून स्थिरता आली व गावात चांगले बस्तानही बसले. अत्र्यांच्या आईचा स्वभाव व घराणे त्यांच्या वडिलांच्या पूर्णपणे उलट होते. ती गोगलगाईसारखी गरीब होती. मात्र तिचा गळा अतिशय गोड होता. कलेची नि नाटयाची आवड त्यांना त्यांच्या आईकडून मिळाली. अशा प्रकारे अत्र्यांचे आई आणि वडील या दोघांच्या स्वभावात पूर्णपणे विसंगती होती.

*** अत्र्यांच्या बालमनाला असणारे वाङ्मयाचे वेड व त्यांची पहिली कविता –**

अगदी लहानपणापासून अत्र्यांच्या मनावर अत्रे घराणे, कऱ्हे पठाराचा इतिहास, तिथली ऐतिहासिक पार्श्वभूमी यांचा परिणाम झाला. त्यांचे एकूण व्यक्तिमत्वच चेंडूसारखे असल्याने अगदी बालपणापासून त्यांना कोणत्याही गोष्टीचे वावडे नव्हते. 1907–8 च्या सुमारच्या काळातील धार्मिक, सांस्कृतिक वातावरणाचा त्यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. ते नऊ वर्षाचे असताना एकदा गावातील देवळात एक हरदासी आले. त्यांनी सासुरवाशीणीच्या तोंडचे "भवानिआई रोडगा वाहिन तुला! नणंदेचे कारटे किरकिर करते, खरुज होऊदे त्याला" हे भारुड म्हणून दाखवले. ह्या गाण्याची चाल अत्र्यांच्या बालमनाला इतकी आवडली की त्या चालीवर त्यांनी सीताबाई नावाच्या एका तिरळया स्वयंपाकीणीवर ताबडतोब कविता बनवली.

"सीताबाई वर्णू किती तव गुण ?<br>
डोळा काणा, नाक वाकडे बधिर असती तव कर्ण ।<br>
एकादशीला उपास करुनी खाई कांदा लसूण"[3]

हीच अत्र्यांनी लिहिलेली पहिली मराठी कविता. नवव्या वर्षी लिहिलेल्या ह्या काव्यातही त्यांच्यामधील मूळ विडंबनकाराचे दर्शन घडते. टवाळी आणि वात्रटपणाबरोबरच त्यांच्या मनात रसिकताही होती. त्यांच्या आजीचे भाऊ हिवरे गावी राहात असत. डिसेंबर महिन्यात त्यांच्याकडे दत्ताचा उत्सव असे. ह्या उत्सवाला अत्रे मंडळी जात असे. तेथे होणारी ललिते पाहूनच अत्र्यांच्या मनात नाटयबीज अंकुरले.

सासवडमध्ये ख्रिस्ती मिशनने काढलेल्या लहानशा वाचनालयात त्यांना 1907 साली 'मासिक मनोरंजन' चे काही जुने अंक वाचावयास मिळाले व त्यांच्या मनात खऱ्या अर्थाने वाङ्मयीन अभिरुची निर्माण झाली.

भावे स्कूलमधील काही वाङ्मयव्यासंगी शिक्षकांच्या सहवासामुळे त्यांच्या मनात वाङ्मयासंबंधी व काव्यासंबंधी आवड वाढीस लागली. या कालावधीत त्यांनी इंग्रजी किंवा संस्कृत कविता घेऊन आपटयांच्या गीर्वाणवाणी कोशाच्या साहाय्याने संस्कृतप्रचूर मराठी भाषांतर करण्याचा सपाटा सुरु केला.

दरम्यानच्या काळात त्यांनी शिमग्याच्या सणापासून ते तरुणींच्या प्रेमापर्यंत विविध विषयांवर लिहिलेल्या कविता छोटया मोठया मासिकांमधून छापून आणण्याचा खूप प्रयत्न केला पण त्यास यश आले नाही. शेवटी त्यांच्या थोरल्या चुलत्यांच्या वशिल्याने 'शाला पत्रका' चे काम पाहणाऱ्या एका शिक्षकाशी संधान बांधून 'श्रीमंत नारायणराव पेशवे यांचा वध' या मथळयाची एक कविता छापून आणली. ही अत्र्यांची प्रसिद्ध झालेली पहिली कविता.

*** अत्रे व गडकरी यांची भेट –**

1912 साली अत्र्यांची आणि राम गणेश गडकरी यांची भेट झाली. ही भेट योगायोगाने झाली. गडकऱ्यांशी परिचय झाल्यावर त्यांनी आपला 'फुलबाग' हा हस्तलिखित काव्यसंग्रह त्यांना दाखवला. गडकऱ्यांनी तो चाळून औपचारिक पसंती व्यक्त करुन त्यांना आधुनिक कविता वाचावयाचा उपदेश केला. तेंव्हा आपल्या त्यावेळच्या काव्यविषयक अज्ञानाचे काहीसे प्रदर्शन करुन अत्रे म्हणतात," 'केशवसुत' आणि 'दत्त' ह्या थोर कवींची नावे प्रथम गडकऱ्यांच्या तोंडून मी ऐकली. गडकऱ्यांनी स्वतःच्या उपयोगासाठी एक कवितेचा संग्रह स्वतःच्या हस्ताक्षरात लिहून काढला होता. तो त्यांनी मला पहावयाला दिला. त्यात केशवसुतांची 'रांगोळी घालताना पाहून' आणि दत्तांची 'विश्वामित्रांची काठी' या दोन कविता वाचून माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. जुन्या काव्याचे संस्कार त्या काव्याच्या वाचनाने एकदम माझ्या मनामधून

कातीसारखे गळून पडले. काव्याची स्फूर्ती जरी मी बालकवि ठोमऱ्यांपासून घेतली असली तरी आधुनिक कवितेचा मार्ग मला गडक–यांनीच दाखवला. गडकरी जर मला त्या वयात भेटले नसते तर केशवसुतांच्या महान काव्याशी माझी इतक्या लौकर ओळख झाली असती की नाही याची मला शंका आहे"[4] या अत्र्यांच्या उक्तिवरुन आपल्या वाङ्मयीन जडणघडणीमध्ये गडकऱ्यांना अत्रे किती उच्च स्थान देतात याची कल्पना येते.

*** अत्र्यांची पहिली कादंबरी –**

अत्रे इंग्रजी पाचवीत असताना मॅकमिलन ह्या सुप्रसिद्ध इंग्रजी कांदबरीकाराची'In Wild Maratha Battles' ही कादंबरी त्यांच्या वाचनात आली आणि आपणही त्या विषयावर कादंबरी लिहावी असे ठरवून 'महाराष्ट्र मोहरा' ही शंभर सव्वाशे पानांची कादंबरी पंधरा दिवसांत लिहून काढली. कादंबरी छापण्यासाठी त्यांनी कादंबरीचे हस्तलिखित शिवराम महादेव परांजप्यांना दाखवले पण त्यांनी एवढयात लेखनाची घाई करु नकोस अशी बोळवणी करुन ह्या चौदा वर्षाच्या मुलाची समजूत काढली. पण त्यांच्यामधील कादंबरीकार काही गप्प बसला नाही. शिवराम पंतांकडून निराशा झाल्यावर शंकर हरि मुळे यांच्या 'चित्तरंजन माले' मधून कादंबरी छापण्याविषयी शंकर हरि मुळे यांच्याशी संपर्क साधला. त्यांना ती कादंबरी पसंत पडून त्यांनी ती क्रमशः छापण्यासाठी ठेवूनही घेतली. मात्र कादंबरी छापायला सुरुवात करण्यापूर्वीच मुळयांची 'चित्तरंजन माला' बंद झाली. दुसऱ्या वर्षी अत्रे इंग्रजी सहावीत आले तेंव्हा जुन्नरच्या मोडक नावाच्या मुलाशी त्यांची मैत्री झाली. त्यावेळी जुन्नरला बागाईतदार नावाचे एक गृहस्थ 'प्रेमोद्यान' नावाचे मासिक काढत. त्यांच्याशी मोडकांची ओळख होती. त्यांच्या ओळखीने 'महाराष्ट्र मोहरा' ही कादंबरी 'प्रेमोद्यानातून वर्षभर क्रमशः प्रसिद्ध झाली. पुढे त्यांनीच ती पुस्तकरुपाने प्रसिद्ध केली. कादंबरी प्रमाणेच गोष्टी किंवा लघुकथा लिहिण्याचा नाद त्यांना याचवेळी लागला. 'मासिक मनोरंजनामधून अनामिक गोष्टी लिहिणारे वि. सी. गुर्जर, [illegible] यांच्या गोष्टी त्यांना खूप आवडत असत. मात्र खऱ्या अर्थाने गोष्टी लिहिण्याची प्रेरणा अत्र्यांना भीमराव खंडेराव कोरान्ने यांच्यामुळे झाली. पुढे 1916 सालापासून 'मासिक मनोरंजना' मधून त्यांच्या कविता देखील प्रसिद्ध होऊ लागल्या.

*** अत्र्यांची खिलाडू मनोवृत्ती –**

शिक्षणाबरोबर वेगवेगळे छोटेमोठे वाङ्मयीन व्याप करीत अत्रे 1914 साली मॅट्रिकच्या वर्गात आले. त्याचवर्षी ऑगस्ट महिन्यात युरोपमध्ये पहिले महायुद्ध सुरु झाले. युद्धात जर्मनी

ब्रिटिशांचा पराभव करणार आणि भारतावर जर्मनीचे राज्य येणार अशी अफवा पसरल्याने आणि याचा परिणाम म्हणजे 'यंदा मॅट्रिकच्या परीक्षा होणार नाहीत' असा सर्वांचाच अंदाज असल्याने अत्र्यांनी वर्षभर अभ्यासाकडे पूर्ण दुर्लक्ष करुन क्रिकेट व वक्तृत्वाकडे लक्ष वळवले. मात्र मॅट्रिकची परीक्षा न चुकता वेळेवर झाली आणि अत्र्यांना परीक्षेला बसावे लागले. विशेष म्हणजे वर्षभर अभ्यास न करता क्रिकेट, वादविवाद, वक्तृत्व यावर भर देणारा हा मुलगा मॅट्रिकची परीक्षा पहिल्याच प्रयत्नात पासही झाला.

*** अत्र्यांचे महाविद्यालयीन जीवन (अत्रे व फर्ग्युसन कॉलेज)**

1915 साली जानेवारी महिन्यात महाविद्यालयीन शिक्षणासाठी अत्रे फर्ग्युसन कॉलेजमध्ये दाखल झाले. रँग्लर परांजपे हे त्यावेळी फर्ग्युसन कॉलेजचे आकर्षण होते. रँग्लर परांजप्यांबद्दलच्या आकर्षणामुळेच अत्र्यांना परांजपे शिकवित असलेल्या गणित विषयाबद्दल गोडी निर्माण झाली. मध्यंतरीच्या काळात त्यांच्या काव्यलेखनाचा बहर ओसरला होता तो पुन्हा फर्ग्युसन कॉलेजमध्ये आल्यापासून बहरला. कॉलेजचे एक त्रैमासिक निघत असे. त्यातून 'मकरंद' ह्या टोपणनावाने त्यांच्या बऱ्याचशा कविता प्रसिद्ध झाल्या. पण त्यांचे स्वरुप बरेचसे रुपांतरीत होते. त्यानंतर त्यांनी काव्यासाठी घेतलेले 'मकरंद' हे नाव टाकून देऊन स्वतःच्याच नावाने कविता प्रसिद्ध करु लागले. 'काजवे' ही त्यांची स्वतंत्र कविता त्रैमासिकात प्रसिद्ध झाली तेव्हा तिचे बरेच कौतुक झाले. नंतर थोडयाच दिवसात 'चांदणी' ही कविता 'मासिक मनोरंजन' मधून केशवकुमार या नावाने प्रसिद्ध झाली. याच बरोबरीने त्यांचा व गडकऱ्यांचा घरोबा बराच वाढत चालला होता. गडकऱ्यांच्या घरी त्यांचे नेहमी जाणे येणे असे. एकदा असेच ते गडकऱ्यांच्या माडीवर बसले असताना अच्युतराव कोल्हटकर गडकऱ्यांकडे आले. गडकरी व अच्युतरावांच्या गप्पागोष्टींचा लाभ घेण्याचे भाग्य अत्र्यांना योगायोगाने लाभले. शिक्षण चालू असतानाच दि. 22 डिसेंबर 1917 मध्ये त्यांचे वडील संग्रहिणीच्या आजाराने वारले. ते ज्या 'पूना बँके' त काम करीत होते. त्या बँकेच्या मालकाकडून उघडयावर पडलेल्या अत्रे कुटुंबाला फक्त वीस रुपयांची मदत मेहरबानी करावी तशी करण्यात आली. स्वाभिमानी अत्र्यांनी ती भीकवजा मदत नाकारली आणि आपण एखादी कादंबरी लिहून पैसे मिळवावेत असा त्यांच्या मनात विचार आला. शेरलॉक होम्सचा निर्माता सर ऑर्थर कॉनन डॉईल ह्या प्रसिद्ध लेखकाची 'Hound of the Baskervilles' ही रहस्यकथा त्यांनी थोडयाच दिवसांपूर्वी वाचली होती. तिचे रुपांतर एका आठवडयात करुन 'मोहित्यांचा शाप' ही कादंबरी त्यांनी लिहून पूर्ण केलीआणि मुंबईच्या 'हिंद एजन्सी एक आणा

पोस्त्यने पाठवून दिली. या कादंबरीचे 26 रूपये दहा आणे एवढे मानधन मालेने अत्र्यांना मनिऑर्डरने पाठवून दिले.

डिसेंबर 1917 ह्या तेरा महिन्यांच्या कालावधीत अत्र्यांचे मनोबल खचवणा-या तीन घटना घडल्या. 22 डिसेंबर 1917 ला त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला. 5 मे 1918 ला बालकवी ठोमरे यांचे अपघाती निधन झाले आणि 23 जानेवारी 1919, ला अत्र्यांचे नाटयगुरू गडकरी याचे वयाच्या चौतीसाव्या वर्षी अकाली निधन झाले. गडक-यांचा मृत्यू तर अत्र्यांची परीक्षा अवघी दोन महिन्यांवर आली असताना झाला. त्यामुळे परीक्षेचा अभ्यास काही झालाच नाही. मनाच्या उद्विग्न अवस्थेतच त्यानी बी. ए. ची परीक्षा दिली. कटुंबाची सर्वतोपरी जबाबदारी त्यांच्याच अंगावर असल्याने काही तरी काम मिळविण्याशिवाय गत्यंतर नव्हते. म्हणून बी. ए. ची परीक्षा झाल्यावर पुण्याच्या 'मिलिटरी अकाऊंस्' खात्यात महिना एकशे दहा रूपये पगारावर नोकरी धरली. 13 जून 1919 ला बी. ए. परीक्षेचा निकाल लागला. आणि ते नेहमीप्रमाणे काठावर पास झाले. एकूणच अगदी शालेय जीवनापासून ते महाविद्यालयीन जीवनापर्यंत त्यांनी अभ्यासापेक्षा इतर उद्यांगच जास्त केले. यावरून त्यांच्या स्वभातील उपद्व्यापीपणा दिसून येतो.

*** अत्रे पुणे सोडून मुंबईकडे –**

अत्र्यांनी आयुष्यात वकील व्हावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. म्हणून वडिलांचो अपूर्ण इच्छा पूर्ण करण्याचया विचाराने बी. ए. चा निकाल लागल्यानंतर एल. एल बी च्या वर्गात प्रवेश घेण्यासाठी ते मुंबईला आले. तिथे त्यांना सँढर्स्ट हायस्कूल' अशी पाटी दिसली. म्हणून सहज चौकशी करावी म्हणून ते शाळेत आले. शाळेत प्रिन्सिपल जयकरांना त्यांनी शिक्षकाच्या नोकरीसंबंधी विचारले व महिना50 रूपयावर शिक्षक म्हणून त्यांची नेमणूक झाली. प्रिन्सिपल जयकरांनी पहिल्या महिन्याचा पगार ठरल्याप्रमाणे दिला पण दुस-या महिन्यापासून काहीबाही कारणे सांगून पगाराला कात्री लावायला सुरूवात केली. दिवाळीच्या सुट्टीनंतर अत्रे शाळेत आले तेंव्हा ते हायस्कूल बंद पडल्याचे त्यांना समजले. योगायोगाने लगेच तासाभ-यात त्यांची 'रॉबर्ट मनी स्कूल' मध्ये नाटयमयरीत्या महिना साठ रूपये पगार नेमणूक झाली. पण तिथेही ते फार काळ टिकले नाहीत. मुंबईमधल्या प्रसिद्ध 'भर्डा न्यू हायस्कूल'मध्ये 1 जाने. 1920 पासून त्यांची महिना 150 रूपयावर नेमणूक झाली. 'भर्डा न्यू हायस्कूल' मध्ये पहिल्या पहिल्यांदा तिथल्या विद्यार्थ्यांनी त्यांना त्रास देण्याचा प्रयत्न केला पण अत्र्यांच्या हजरबाबीपणामुळे त्यांच्या विद्यार्थ्यांवर वचक बसला.

दरम्यानच्या काळात ते अधूनमधून कायदयाच्या वर्गात जात असत. परीक्षा फार्मही भरत

होते. पण एल. एल. बी. मात्र झाले नाहीत. ते मुंबईत असतानाच दि. 1 ऑगस्ट 1920 रोजी लोकमान्य टिळकांचे मुंबईच्या सरदारगृहामध्ये निधन झाले. मुंबईत टिळकांच्या विराट स्मशान यात्रेत अत्रेही सामील होते. लोकमान्यांच्या निधनानंतर 13 व्या दिवशी अच्युतरावांनी त्यांच्या 'संदेश' पत्रामधून लिहिलेला टिळकांवरील मृत्युलेख अत्र्यांच्या अंतःकरणाला भिडला. त्या मृत्युलेखाविषयी ते लिहितात. " लोकमान्यांच्या मृत्यूवर अनेक वृत्तपत्रांनी त्यावेळी अग्रलेख लिहिले असतील. पण अच्युतराव कोल्हटकरांनी आपल्या 'संदेश ' पत्रात जो बत्तीसस्तंभी अग्रलेख त्यांच्या तेराव्या दिवशी लिहिला तसा मृत्युलेख अद्याप मराठी भाषेत तरी कोणी लिहिलेला नाही."[5] अत्र्यांच्या या वक्तव्यावरून त्यांच्या मनातील लो. टिळकांविषयीची राजकीयनिष्ठा तर व्यक्त होतेच पण त्याचबरोबरीने अच्युतरावांवरील वाङ्मयीन निष्ठाही स्पष्ट होते आणि त्यांच्या मनातील मृत्युलेख ह्या वाङ्मयप्रकाराचे विशिष्ट आकर्षणही जाणवते. त्यांची मुंबईत शिक्षकाची नोकरी सुरू असतानाच मुंबईतील टिळक भक्तांनी लोकमान्यांच्या स्मरणार्थ सुरु केलेल्या 'लोकमान्य' पत्राच्या संपादकीय वर्गात शिरण्याचा त्यांनी खूप प्रयत्न केला पण त्यात त्यांना अजिबात यश आले नाही. यावरून त्यांच्या मनातील पत्रकारितेबद्दलचे आकर्षण दिसून येते. टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांनी जवळजवळ आपल्या मनातील राजकारणाबद्दलचे आकर्षण काढून टाकले आणि आपले मन साहित्यात रमवले या दरम्यान त्यांचा आयरिश कवी आणि नाटककार ऑस्कर वाईल्ड याच्या वाङ्मयाशी संबंध आला व त्याकडे त्यांचे मन आकर्षित झाले. आपल्यावरील ऑस्कर वाईल्डच्या परिणामासंबंधी ते लिहितात, "गडकऱ्यांच्या खालोखाल जर माझ्या जीवनावर आणि वाङ्मयावर कोणाचा परिणाम झाला असेल तर तो ऑस्कर वाईल्डचा."[6] अत्र्यांच्या या वक्तव्यावरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर गडकरी व ऑस्कर वाईल्ड यांचा परिणाम किती महत्त्वपूर्ण आहे याची कल्पना येते. अशा प्रकारे अत्रे शिक्षकी पेशाबरोबर वाङ्मयीन अभिरूची संपादित कसे-बसे मुंबईच्या वातावरणाशी जमवून घेत होते पण शेवटी त्यांच्या प्रकृतीला मुंबई मानवेना म्हणून 1911 साली 'मर्डोन्यू हायस्कूल ' चा राजीनामा देवून आणि मुंबईचे बिऱ्हाड आवरून ते पुण्यास परत आले.

*** अत्र्यांचे पुण्यामधील शैक्षणिक व वाङ्मयीन कार्य –**

अत्रे जेंव्हा मुंबईहून पुण्याला आले तेंव्हा त्यांची प्रकृती चांगलीच खालावली होती. प्रकृतीत थोडाफार फरक जाणवल्यावर त्यांना करण्यासारखा एकच व्यवसाय होतो. तो म्हणजे शिक्षकी. कारण, नाही म्हटले तरी त्यांना ह्या व्यवसायाचा अनुभव होता. त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न सुरु केले.

त्यांचे चुलते दिनकर विनायक हे कॅंप एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत शिक्षक होते. त्यांनी त्यांच्या नोकरीचा राजिनामा देऊन वकिली करायचे ठरवल्याने साहजिकच ती जागा मोकळी झाली होती. योगायोगाने अत्र्यांची तेथे हेडमास्तर म्हणून महिना पस्तीस रुपये पगारावर नेमणूक झाली. त्याप्रमाणे फेब्रुवारी 1922 पासून कॅंप एज्युकेशन सोसायटीच्या हेडमास्तर पदाची सूत्रे त्यांनी हातात घेतली. पुण्याच्या लष्कर विभागातील या मरगळलेल्या शाळेचा त्यांनी आपल्या कारकिर्दीत पूर्णपणे कायापालट केला.

याच दरम्यान 16 मे 1922 या दिवशी अत्र्यांचा पहिला विवाह झाला. ज्या वर्षी त्यांचे लग्न झाले त्याच 1922 च्या मे महिन्यात शाळेला सुट्टी असताना चकाटया पिटत पिटत त्यांनी बहुतांशी विडंबन काव्ये लिहिली. मात्र ती प्रसिद्ध करण्याचे धैर्य त्यांना झाले नाही. ही विडंबने लिहूनही चार वर्षे ते हस्तलिखित त्यांनी तसेच ठेवून दिले. या दरम्यान त्यांची कॅंप एज्युकेशन सोसायटीमधील नोकरी चालूच होती. 1924 च्या प्रारंभी शाळेच्या झालेल्या तपासणीच्या अहवालात त्यावेळचे एज्युकेशन इन्स्पेक्टर कृष्णराव पुंडलिक यांनी मुख्याध्यापक अत्र्यांना असा शेरा मारला की, "The Young head master is quite intelligent and enthusiatic, but he should be equipped with the necessary training qualifications."[7] या मिळालेल्या शेऱ्याची पूर्तता करण्यासाठी ताबडतोब ते बी. टी. ची पदवी घेण्यासाठी जून 1924 मध्ये मुंबईच्या ट्रेनिंग कॉलेजात दाखल झाले. तेथे वर्षभर ज्ञानदेवतेची उग्र तपश्चर्या करुन त्यांनी बी. टी. पदवी प्रथम वर्गात संपादन केली. यामुळे एकूणच शिक्षण क्षेत्रात ते शिक्षण तज्ज्ञ म्हणून गणले जाऊ लागले.

दरम्यानच्या कालावधीत 1927 साली मे महिन्यात श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या अध्यक्षतेखाली पुण्यामध्ये भरलेल्या साहित्य संमेलनात 'झेंडूच्या फुलां'मधील पाचसहा कविता म्हणून दाखवण्याची संधी अत्र्यांना मिळाली व त्या विडंबन काव्यांना कमालीची लोकप्रियता मिळाली. अर्थात ही विडंबने ज्यांच्या कवितांवर होती त्यांनी अत्र्यांच्या ह्या काव्यप्रकाराबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली. परंतु केवळ निंदा करणे हा अत्र्यांचा विडंबनलेखनामागील मुळीच उद्देश नव्हता. विडंबन ह्या काव्यप्रकाराबद्दल ते म्हणतात, "विडंबन काव्य हा एक वाङ्मयीन टीकेचा अत्यंत सुसंस्कृत आणि प्रभावी प्रकार आहे. विडंबनाचे हत्यार फार कौशल्याने आणि कोमलतेने वापरायला हवे........ विडंबन हा विरोधी भक्तीचाच एक प्रकार आहे."[8] यावरुन त्यांचा विडंबन लेखनामागील दृष्टिकोन

स्पष्ट होतो.

अशा प्रकारे वाङ्मयीन, शैक्षणिक क्षेत्रात अत्र्यांचा बऱ्यापैकी नावलौकिक झाला असता ते टी. डी. ची पदवी घेण्यासाठी 30 जुलै 1927 रोजी इंग्लडकडे रवाना झाले. अर्थात परदेशी जाऊन उच्च शिक्षण घेण्यासारखी त्यांची आर्थिक परिस्थिती नव्हती. त्यासाठी त्यांना बरेच उपद्व्याप करुन मित्र मंडळींकडून पैशाची जमवाजमव करावी लागली. ऑगस्ट 1927 ते सप्टेंबर 1928 हे तेरा ते साडेतेरा महिने त्यांचे वास्तव्य लंडनमध्ये होते. या कालावधीत टी. डी. ची पदवी मिळवून ते पुण्यास परत आले. मात्र पुण्यास परत आल्यावर त्यांच्यावर एक मोठी कौटुंबिक आपत्ती कोसळली ती म्हणजे त्यांच्या पत्नीचा मृत्यू. त्यामुळे परदेशात जाऊन टी. डी. ची पदवी मिळवून येऊनदेखील ते जीवनात उदास होते. काहीशा विमनस्क अवस्थेतच ते स्वतःला वाङ्मयात, शैक्षणिक लेखन वाचनात गुंतवून घेत होते.

*** अत्र्यांचा दुसरा विवाह – जीवनातील उत्कर्ष – स्थैर्य व अडचणी :**

अत्र्यांचे पुण्यामधील एक हितचिंतक बाळासाहेब घोरपडे यांच्या मध्यस्तीने दि. 3 फेब्रुवारी 1929 रोजी त्यांचा दुसरा विवाह झाला. 1929 हे वर्ष त्यांच्या जिवनातील महत्त्वाचे वर्ष. कारण याच वर्षी फेब्रुवारी मध्ये त्यांचा विवाह झाला. जानेवारी मध्ये गडकरी दिनानिमित्त पुण्याच्या किर्लोस्कर नाटयगृहात झालेल्या कार्यक्रमात पुणेकरांना त्यांच्या प्रभावी वक्तृत्त्वाचे दर्शन झाले – मुंबई सरकारने 'टेक्स्ट बुक कमिटी' वर आणि 'एस. टी. सी.' परीक्षेच्या मंडळावर त्यांची नेमणूक केली. 1929 च्याच मे महिन्यात शि. म. परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली बेळगांव येथे भरलेल्या साहित्यसंमेलनातील काव्यगायनाच्या कार्यक्रमात त्यांनी 'झेंडूची फुले' मधील कविता गाऊन दाखवून उभ्या महाराष्ट्राचे लक्ष 'झेंडूच्या फुलांकडे' वेधले. तसेच 15 नोव्हेंबर 1929 रोजी त्यांची पहिली कन्या शिरीष उर्फ नानी हिचा जन्म झाला. अशा कित्येक बाबतीत त्यांच्या जीवनात 1929 हे वर्ष उत्कर्ष करणारे ठरले.

मात्र त्यानंतर एक वर्षाच्या अंतराने आलेली 1931 आणि 1932 ही दोन वर्षे मात्र त्यांच्या उत्कर्षाला उतरती कळा लावणारी आली. ते 1927 च्या जुलैमध्ये विलायतेस गेले. त्याआधी तीन चार महिने कॅम्प एज्युकेशन सोसायटीचा व्याप वाढल्याने शाळेसाठी अपुरी पडत असलेली इमारत बांधण्यासाठी ' प्रॉमिसरी नोटच्या गुंत्यात गुंतल्यामुळे त्यांना कोर्टात आरोपी म्हणून उभे रहावे लागले. यात त्यांचे आर्थिक नुकसान तर झालेच पण समाजातही विनाकारण बेअब्रु झाली. ह्या मानसिक

त्रासातून तात्पुरती का होईना सुटका करुन घेण्यासाठी याच वेळेपासून त्यांनी मद्यप्राशनास सुरुवात केली. पुढे त्यांची ह्या खटलयातून निर्दोष सुटकाही झाली पण त्यांची स्थिती अगदी मेल्यासारखी झाली होती.

*** अत्र्यांचे प्रभावी वक्तृत्व –**

अत्रे लहान असताना इयत्ता चौथीच्या वर्गात गोष्ट सांगण्यासाठी म्हणून प्रथम आपल्या समवयस्क श्रोत्यांसमोर उभे राहिले. मात्र यावेळी त्यांची चांगलीच भंबेरी उडाली. त्यानंतर भावे स्कूलमध्ये आल्यानंतर 'तुकाराम महाराजांचे चरित्र' या विषयावरचे भाषण तोंडपाठ वक्तृत्व स्पर्धेतील बक्षीस त्यांनी मिळविले. त्यानंतर त्यांच्या महाविद्यालयीन जीवनात वक्तृत्वाचा बहर जवळजवळ ओसरला. मात्र या कालावधीत त्यांनी मोठमोठया वक्त्यांची भाषणे ऐकण्याची संधी सोडली नाही. लोकमान्य टिळक, शिवरामपंत परांजपे इ. वक्त्यांची भाषणे त्यांनी ऐकली असली तरी त्यांच्या मनावर अच्युतराव कोल्हटकर व दादासाहेब खापर्डे या दोन वक्त्यांचा विलक्षण परिणाम झाला.

1926 साली गडकरी स्मृतिदिनानिमित्त पुण्याच्या किर्लोस्कर नाटयगृहात अत्र्यांनी गडक–यांविषयीचे केलेले भाषण श्रोत्यांना तर आवडलेच पण खुद्द अत्र्यांनाही त्यांचे आवडलेले ते पहिलेच भाषण. त्यानंतर ते टी. डी. साठी लंडनला गेले आणि लंडनहून परत आल्यावर 1929 सालाचाही 'गडकरी स्मृतिदिन' त्यांनी गाजवला आणि पुण्यात वक्ता म्हणून त्यांच्या वक्तृत्वाचा लौकिक पसरला. पुणे, मुंबई, बडोदे, नाशिक, बेळगावपर्यंत त्यांनी व्याख्याने दिली. शाळा कॉलेजातील समारंभ, वाङ्मय मंडळाच्या सभा, साहित्यसंमेलने, शैक्षणिक परिषदा, सामाजिक संमेलने, नाटयसंमेलने, कविसंमेलने, गणपती उत्सवातले कार्यक्रम, नाटयप्रयोग, स्मृतिदिन, पुनर्विवाह, निरनिराळया संस्थांचे वर्धापनदिन, उद्घाटन समारंभ, स्मशानयात्रा अशा कितीतरी ठिकाणी त्यांनी शेकडो व्याख्याने दिली. त्यांची ही व्याख्याने देण्याची सवय पुढे पुढे इतकी वाढली की, हॉटेलच्या, खाणावळीच्या हेअर कटींग सलूनच्या आणि तमाशाच्या थिएटरच्या उद्घाटन प्रसंगीही त्यांनी व्याख्याने दिली. त्यांनी आयुष्यभर निरनिराळया विषयांवर इतकी यशस्वी व्याख्याने दिली की गणतीच नाही. त्यामुळे एक यशस्वी वक्ता म्हणून त्यांना महाराष्ट्रात सर्वमान्यता मिळाली.

*** नवयुग वाचनमाला –**

'पिपल्सओन' कंपनीच्या खटल्यामुळे अत्र्यांच्या ढासळलेल्या आर्थिक परिस्थितीला 'नवयुग वाचनमालेमुळे' चांगलीच उभारी आली. 1933 साली ह्या मालेतील पाच पुस्तकांना शासनाकडून मंजुरी घेण्यात आली. ही योजना इतकी यशस्वी झाली की, अत्र्यांची ढासळलेली आर्थिक परिस्थिती एकदम सुधारली. या वाचनमालेल्या यशाबद्दल अत्रे लिहितात, "1933 सालापासून ते आजतागायत म्हणजे तीस वर्षे माझ्या 'नवयुग वाचन मालेने महाराष्ट्राच्या कमीत कमी तीन पिढयांना तरी मराठी

भाषा शिकवली असेल. ह्या मालेवर ' अत्रे निघाटे' ह्यांनी तर हजारो रूपये मिळवले नि प्रकाशक मंगेशराव कुलकर्णी ह्यांनी लाखो रूपये कमावले. किंबहुना त्यांच्या ' कर्नाटक प्रिंटिंग हाऊस'वर ' नवयुग वाचनमालेने सोन्याचा कळस चढवला.'[9] इतके प्रचंड आर्थिक व मानसिक समाधान आणि यश अत्र्यांना ' नवयुग वाचनमालेमुळे मिळाले.

**x अत्र्यांचे नाटयलेखन**

1933 पासूनच अत्र्यांच्या नाटयलेखनासही सुरूवात झाली. तत्पूर्वी ' प्रल्हाद', ' गुरूदक्षिणा', आणि 'वीरवचन', ही तीन नाटके त्यांनी विद्यार्थ्यांसाठी लिहिली होती. मात्र अत्रे खऱ्या अर्थाने नाट्यलेखनाकडे वळले ते ' सांष्टांग नमस्कार' मुळे. 1933 साली त्यांनी लिहिलेल्या पहिल्या नाटकाचे कथानक त्यांना वर्तमानपत्रात आलेल्या ' साष्टांग नमस्कार' या विषयावरील हास्यास्पद व्याख्यानाच्या अहवालामधून सुचले. ह्या नाटकाचा 10 मे 1933 रोजी जेव्हा पहिला प्रयोग झाला तेंव्हा अत्र्यांचे पहिलेच नाटक कमालीचे यशस्वी झाले. त्यांना नाटककार म्हणून मान्यता मिळाली. याच दरम्यान अत्रे व वरेरकर यांच्यात बराचसा वाङ्‌मयीन व तात्विकवाद झाला. मात्र वरेरकरांनी पुण्यातील मोठमोठया संस्था, व्यक्ती व एकूणच पुणेकर यांच्यावर बनावट आरोप केल्याने अंत्र्यांमधील सच्च्या पुणेकराने वरेरकरांची अक्षरशः वाङ्‌मयीन उत्तर क्रिया घातली.

'सांष्टांग नमस्कार'च्या अभूतपूर्व यशाने भारावून त्या नंतर अवघ्या सहा महिन्यात त्यांनी ' घराबाहेर ' हे नाटक लिहिले. त्यानंतर त्यांच्या नाटयलेखनाला अगदी बहरच आला. ' भ्रमाचा भोपळा ' उद्याचा संसार', 'लग्नाची बेडी', 'पराचा कावळा', ' मी उभा आहे.', ' जग काय म्हणेल?' 'पाणीग्रहण', ' कवडीचुंबक ', अशी एका पाठोपाठ एक प्रायोगिक नाटके लिहिली. त्यांनी मराठी रंगभूमीच्या पडत्या काळात तिला सावरण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. नाटयव्यवसायात स्थिरावल्यावर नाटकाकडून ते चित्रपटाकडे वळले. चित्रपट क्षेत्रात बरेच काही करण्याचा उमेदीने. त्यांनी 1939 मध्ये कॅंप एज्युकेशन सोसायटीतील शिक्षकाची नोकरी सोडून दिली. 1922 ते 1939 पर्यंत त्यांनी यशस्वीपणे शिक्षकी व्यवसाय केला.

**x चित्रपट व्यवसायात पदार्पण –**

अत्र्यांना चित्रपटाबद्दल फारसे आकर्षण नसताना 'हंस' पिक्चर्ससाठी म्हणून त्यांनी चित्रपट व्यवसायात पदापर्ण केले. 'धर्मवीर', ( मराठी व हिन्दी ) ' प्रेमवीर', 'बेगुन्हा' ( हिन्दी.) ' 'ब्रह्मचारी' (मराठी), 'बॅण्डीची बाटली' आणि अर्धांगी अशा सहा चित्रकथा त्यांनी हंस पिक्चर्ससाठी लिहिल्या. त्यानंतर त्यांनी स्वतः चित्रपटसृष्टीत धाडसी पाऊल उचलले ते म्हणजे 'नवयुग चित्रपट

लि.'स्थापना करुन स्वतंत्रपणे चित्रपट निर्मिती करण्याचे. ह्या चित्रसंस्थेत प्रारंभी अत्रे, राजगुरुप्रेसचे मालक बापूराव राजगुरु आणि कॉमन वेल्थ कंपनीचे श्री रामभाऊ अभ्यंकर होते. ह्या चित्रपट कंपनीच्या प्रसिद्धीसाठी अत्र्यांनी दि. 21 जाने. 1940 पासून 'साप्ताहिक नवयुग' ही सुरु केले. मोठया उमेदीने ही चित्रपट कपंनी सुरु केली पण या कंपनीचा 'लपंडाव' हा एकच पहिला आणि शेवटचा चित्रपट ठरला. भागीदारांमध्ये मतभेद झाल्याने अत्रे सात हजारांची पुंजी घेऊन कंपनीतून बाहेर पडले आणि त्यांनी 'अत्रे पिक्चर्सची' स्थापना केली. दरम्यान हरिभाऊ मोटे यांच्या 'घरजावई' या चित्रपटासाठी अत्र्यांनी कथा लिहिली व चित्रिकरणासाठी स्टुडिओ भाडयाने घेण्यासाठी म्हणून गेले आणि नानूभाई देसाईंचा स्टुडिओ हप्त्यावर खरेदी केला. 'पायाची दासी', 'राजारानी', 'तसवीर' असे काही मराठी व हिंदी चित्रपट 'अत्रे पिक्चर्स' ने काढले. दरम्यान अत्र्यांना 'वसंतसेना' हा चित्रपट काढत असताना झालेल्या उलटसुलट खर्चामुळे कर्जबाजारी व्हावे लागले. स्टुडिओ गहाण टाकून कसातरी चित्रपट पूर्ण केला. याच दरम्यान 30 आक्टोबर 1942 रोजी नाशिक येथे संपन्न झालेल्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद आचार्य अत्रे यांनी भूषविले. मात्र ते नाशिकमध्ये साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून भाषण करीत होते. त्याचवेळी मुंबईत 'वसंतसेना' हा चित्रपट प्रदर्शित होत होता. या चित्रपटामुळे ते कर्जबाजारी झाले आणि त्यांना कर्जापोटी स्टुडिओ विकावा लागला. मात्र चित्रपट व्यवसायात झालेले कर्ज चित्रपट काढूनच फेडायचे या निर्धाराने त्यांनी 'बाईलवेडा', 'दिल की बात', ' परींदे', ' मोरुची मावशी' 'ब्रह्मघोटाळा', 'श्यामची आई', 'महात्मा फुले' या चित्रपटांची निर्मिती केली. त्यांच्या 'श्यामची आई' या चित्रपटाला 1953 सालचा 'उत्कृष्ट भारतीय चित्रपट' म्हणून 'राष्ट्रपतींचे सुवर्णपदक' मिळाले. तर 'महात्मा फुले' या चित्रपटास 1954 सालचे उत्कृष्ट मराठी चित्रपट म्हणून 'राष्ट्रपतींचे रौप्यपदक' मिळाले. अशा प्रकारे चित्रपट व्यवसायात आर्थिक धक्के खाऊनही अत्र्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला.

*** अत्र्यांची पत्रकारिता –**

अत्र्यांना अगदी लहानपणापासून पत्रकारितेचे आकर्षण होते. अच्युतराव कोल्हटकरांच्या 'संदेश' पत्राचे ते वाचक होते. त्यांना अपेक्षित असणारे वाङ्मयीन राजकारण त्यांना 'संदेश' मध्ये वाचावयास मिळत असे. ते चौदा पंधरा वर्षाचे असताना त्यांनी 'सहृदय' ह्या टोपणनावाने 'संदेश' कडे एक पत्र पाठवले. पण अच्युतरावांनी ते छापले नाही. फक्त पाचसात ओळीत त्या पत्राचा सारांश छापला. हे अत्र्यांचे पहिले वृत्तपत्रीय लेखन. 'संदेश' प्रमाणेच ते हरिभाऊंच्या

13245
A

'करमणूक' आणि 'ल. रा. पांगारकरांच्या 'मुमुक्षु' चेही वाचक होते. पण ही काही वृत्तपत्रे नव्हती लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर मुंबईमध्ये काकासाहेब खाडिलकरांच्या संपादकत्वाखाली 'लोकमान्य' हे पत्र निघणार असून त्यासाठी 'दुय्यम संपादक पाहिजे' अशा आशयाची जाहिरात अत्र्यांच्या वाचनात आल्यावर सहसंपादक म्हणून काम मिळविण्यासाठी ते खाडीलकरांकडेगेले. पण तत्पूर्वी कुठल्या वर्तमानपत्रात काम करण्याचा अनुभव नसल्याने त्यांना ते काम मिळाले नाही. दरम्यानच्या दहाएक वर्षात त्यांनी वृत्तपत्राकडे थोडे दुर्लक्षच केले. त्यानंतर ते इंग्लडहून परत आल्यावर वेगवेगळया विषयांवर त्यांनी दिलेली व्याख्याने काकासाहेब लिमये यांनी 'ज्ञानप्रकाश' मधून अहवालरुजा छापून त्यांना प्रसिद्धी मिळवून दिली. त्यानंतर 'ज्ञानप्रकाशमधून' घारुआण्णा घोडनदीकर ह्या टोपण नावाने अत्र्यांनी काही मिष्कील व विनोदी लेखन केले. दरम्यान 1934 साली अनंतराव गद्रे यांनी मुंबईमधून प्रसिद्ध होणारे 'निर्भीड' हे साप्ताहिक काढले. याच सुमारास मामा वरेरकरांनी आपल्या एका व्याख्यानात पुणेकरांविषयी व पुण्याविषयी भयंकर आरोप करणारे वक्तव्य केले होते. याबद्दल 'निर्भीड' मधून चारपाच लेख लिहून त्यांनी मामांची अक्षरशः भंबेरी उडवली. हे लेखन 'अत्रे वरेरकर वाद' ह्या नावाने खूप गाजले. नंतर 'निर्भीड' ने अत्र्यांच्या 'घराबाहेर' नाटकाचा विशेषांक काढला. त्यात स्वतः अत्र्यांनी 'घराबाहेर' च्या टीकाकारांना उत्तरे देण्यासाठी सत्तरऐंशी स्तंभाचा भला मोठा लेख लिहिला.

यानंतर प्रभाकर श्रीपाद कोल्हटकर यांच्या 'संजीवन' या पत्रातील 'आकाशवाणी' हे सदर अत्र्यांनी 'वायुपुत्र' ह्या टोपणनावाने लिहिले. तसेच गोपाळ गोविंद अधिकारी यांच्या 'प्रवासी' ह्या साप्ताहिकात त्यांनी 'बोल घेवडा' ह्या नावाने लिहिलेले 'बोलघेवडयाच्या शेंगा' हे सदरही खूप लोकप्रिय ठरले.

मसत्र ह्या कालावधीत अत्र्यांना 'ज्ञानप्रकाश' व 'निर्भिड' मुळेच खूप नावलौकिक मिळाला.

*** 'नवयुग' अत्र्यांचे स्वतंत्र साप्ताहिक –**

1939 साली शिक्षकी व्यवसाय सोडून अत्रे चित्रपट व्यवसायाकडे वळले तेव्हा 'नवयुग चित्रपट लि.' ची स्थापना केली व चित्रपटांच्या प्रसिद्धीसाठी म्हणून 'नवयुग' हे साप्ताहिक त्यांनी काढले. 'नवयुग' चा पहिला अंक दि. 19 जानेवारी 1940 रोजी प्रसिद्ध झाला. पहिल्या अंकाच्या पाच हजार प्रती लगोलग खपल्या. नंतर दिवसेंदिवस 'नवयुग' चा खप खूपच वाढला. 'नवयुग' मध्ये साहित्य, विनोद, टीका याबरोबर 'अत्रे उवाच' हे सदर वाङ्मयीन, सामाजिक, सांस्कृतिक अंगाने लिहिले जाई. राजकारणातील अनिष्ट प्रवृत्तींचा आणि व्यक्तींचा ते 'नवयुग' मधून खरपूस

समाचार घेऊ लागले. त्यामुळे 'नवयुग' अनेकांच्या डोळयात खुपू लागला. या साप्ताहिकामुळे अनेकांचे रोष अत्र्यांना पत्करावे लागले. पुढे ते 'नवयुग चित्रपट लि.' मधून आहेर पडल्यांतर 1944 मध्ये त्यांनी प्रेस खरेदी करुन त्यास 'अत्रे प्रिंटीग प्रेस' असे नाव दिले आणि 'नवयुग' चे संपादन वेगळया प्रकारे सुरु केले. जोडीला त्यांनी 'समीक्षक' हेही मासिक सुरु केले. 'नवयुग' चे स्वरुप पूर्णपणे वाड्.मयीन झाल्यावर ख-या अर्थाने 'नवयुग' ला बहर आला. दरम्यान दि. 2 जून 1947 ला त्यांनी 'जयहिंद' हे सायंदैनिकही सुरु केले. मात्र ते जेमतेम वर्षभर चालवून दि. 2 जून 1948 ला त्यांना ते बंद करावे लागले.

*** दै. 'मराठा' चा जन्म (अत्र्यांची बहरलेली पत्रकारिता)**

भारत स्वातंत्र्य मिळविण्याच्या उंबरठयावर असताना मे 1946 मध्ये ग त्र्यं माडखालेकर यांच्या अध्यक्षतेखाली बेळगांव येथे भरलेल्या साहित्यसंमेलनात माडखोलकरांनी आपल्या भाषणात संयुक्त महाराष्ट्राचा विचार मांडला आणि याविषयी ठरावाच्या विषय नियामक समितीचे काम अत्र्यांकडे आले. यातूनच 'संयुक्त महाराष्ट्र समिती' चा विचार पुढे आला. स्वातंत्र्योत्तर काळात कॉंग्रेसचे राज्यकर्जे आणि अत्रे यांच्यात काही मतभेद होऊन अत्रे कॉंगेसच्या राजकारणातून बाहेर पडले. या मतभेदांमधीलच एक भाग म्हणजे राज्यकर्त्यांचा 'संयुक्त महाराष्ट्रा'स असणारा विरोध. मात्र हा लढा त्यांनी आपल्या संयुक्त महाराष्ट्रवादी कार्यकर्त्यांसह निकराने लढवला. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या बातम्यांना व कार्याला त्यावेळची स्थानिक वृत्तपत्रे डावलू लागली. तेंव्हा अत्र्यांनी संयुक्त महाराष्ट्रवादी पत्र काढावे असे ठरले. त्यानुसार सेनापती बापटांनी ह्या पत्राचे नांव 'मराठा' असे सुचविले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला पूर्णपणे वाहिलेल्या दै. 'मराठा' चा पहिला अंक गुरुवार दि. 15 नोव्हेंबर 1956 या दिवशी निघाला. पहिल्याच अंकाच्या खपाचा आकडा 25,000 वर पोहोचला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला विरोध करणा-यांच्या दृष्टीने 'मराठा' हे खरोखरच अस्त्र ठरले. दै. मराठयाच्या जन्मापासून (दि. 15 नोव्हें. 1956 ते संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीपर्यंत (1 मे 1960) अत्र्यांनी वक्तृत्वातून, नेतृत्वातून व 'मराठा' मधील घणाघाती प्रहारांच्या 'संयुक्त महाराष्ट्रविषयक' लेखनातून निकराचा लढा दिला. व आपले मराठीपण आणि महाराष्ट्राचा स्वाभिमान समर्थपणेमिरविला. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर 'मराठा' हे पत्र त्यांनी आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत चालविले. पत्रकार म्हणून त्यांचा नावलौकिक 'नवयुग' साप्ताहिक व दैनिक 'मराठा'मुळे उभ्या महाराष्ट्रात झाला.

'नवयुग' व 'मराठा' मधून त्यांनी जे प्रसंगोपात् लेखन केले त्यातीलच एक भाग म्हणजे त्यांनी वेळोवेळी लिहिलेले मृत्युलेख. 'मराठा' च्या जन्मापासून त्यांच्या पत्रकारितेला बहर आला. 'मराठा' पत्राच्या अग्रलेखांसाठी त्यांनी लिहिलेल्या मृत्युलेखांचे लेखन जरी घाईगर्दीत केले असले तरीदेखील मराठी पत्रकारितेमध्ये 'मृत्युलेखकार' म्हणून अत्र्यांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. आघाडीचा वक्ता व जातीवंत पत्रकार म्हणून त्यांचे नाव त्यांच्या आयुष्याच्या अखेरपर्यंत तर निनादलेच पण त्यांच्या मृत्यूनंतरही निनादत राहिले. 13 जून 1969 ह्या दिवशी हा महाराष्ट्राचा परीस काळाच्या पडद्याआड गेला.

अत्र्यांच्या एकंदरीत जीवनाचा विचार करता अत्रे हे एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व असल्याचे आपणास प्रत्ययास येते. त्यांनी आपले उभे आयुष्य अभिरुची संपन्न मनोवृत्तीने चाखले. त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन संपन्न व वाङ्मयीन आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमध्ये अगदी बालपणापासून त्यांची वाङ्मयीन अभिरुची दिसून येते. त्यांच्या आयुष्यात अनेक योगायोग आले आणि त्यांचा लाभ घेतला. मात्र त्याबरोबर त्यांच्या जीवनात काही झंझावाती वादळेही आली. त्या वादळांना देखील ते धैर्याने सामोरे गेले. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांचा जीवनविषयक स्वीकारात्मक दृष्टिकोन ढळला नाही. आपल्या आयुष्यात त्यांनी विविध क्षेत्रे पादाक्रांत केली पण कोणत्याही एका क्षेत्राला ते चिकटून राहिले नाहीत. त्यांचे जीवनावर विलक्षण प्रेम होते. मनमुराद पणे जीवनाचा त्यांनी आस्वाद घेतला.

*** आचार्य अत्र्यांच्या मृत्युलेख लेखनामागील प्रेरणा –**

आचार्य अत्रे यांचे व्यक्तिमत्त्व कलंदर कलावंताचे आहे. ते विनोदी लेखक, वक्ते, नाटककार, विडंबनकार, शिक्षक, चित्रपटकार म्हणून जरी परिचित असले तरी त्यांच्या मनाला कारूण्याचे स्वाभाविक आकर्षण आहे. खुद्द अत्र्यांनीच आपण गडकरी भक्त असल्याचे नमूद केले असून आपण ठरवले एक आणि झालो दुसरेच अशी कबुली दिली आहे. "मला बालकवी व्हायचे होते. मला गोविंदाग्रज व्हायचे होते. त्यासाठी माझी खटपट चालू होती, पण ते सगळे राहिले बाजूला आणि 'देवाच्या आळंदीला पोहचायच्या ऐवजी मी चोरांच्या आळंदीला जावून पोहचलो."[10] यावरून अत्र्यांना विनोदापेक्षा कारूण्याचेच आकर्षण अधिक होते हे निश्चित. या आकर्षणामधून मृत्युलेखांचे लेखन केल्यामुळे त्यावर त्यांच्या मूळ स्वभावधर्माचा ठसठशीत ठसा उमटला आहे. त्यांनी स्वतःला गुदगुल्या करून हसवले पण अश्रूंचे ओहळ मात्र स्वाभाविकपणे गाळले. त्यांनी लिहिलेले मृत्युलेख म्हणजे कारूण्याचा अविष्कार असून पत्रकाराच्या भूमिकेतून त्या त्या व्यक्तिंना' वाहिलेली

ती वाङ्मयीन आदरांजली होय. मृत्युलेखाचे लेखन प्रसंगोपात असल्याने त्या प्रसंगाचे औचित्य व ज्या व्यक्तिचे निधन झाले आहे. तिच्याबद्दल माहिती देणे हीच ह्या लेखनामागील मूळ प्रेरणा होय.

एका अर्थाने हे मृत्युलेख म्हणजे अत्र्यांनी नव्या पिढीसमोर त्या त्या व्यक्तींचे ठेवलेले वाङ्मयीन स्मरण होय. त्यांनी हे लेखन जरी पत्रकाराच्या भूमिकेतून केलेले असले तरी त्यांच्या पत्रकारितेची शैली मात्र वाङ्मयीन आहे. अच्युतरावांच्या 'संदेश' ह्या पत्रामुळे अत्र्यांना वर्तमानपत्रे आवडू लागली. अन्यथा वृत्तपत्रात वाङ्मय नसल्याने ती त्यांना आवडत नसत. अत्रे म्हणतात. " वाङ्मयाच्या मधुर पाकात राजकारण तळून ते वाचकांना द्यावयाचे हे अच्युतरावांच्या वृत्तपत्राचे वैशिष्ट्य.अच्युतरावांच्या त्या शैलीचा माझ्या मनावर फार परिणाम झाला."[11] यावरुन अत्र्यांचा वृत्तपत्रीय लेखनविषयकदृष्टिकोन स्पष्ट होतो. त्याचप्रमाणे लो. टिळकांच्या निधनानंतर ज्यावेळी अच्युतराव टिळकांवर मृत्युलेख लिहायला बसले होते ते ऐतिहासिक दृश्य अत्रे पुन्हापुन्हा पाहून येतात. या अत्र्यांच्या जीवनातील प्रसंगामध्ये देखील त्यांच्यातील मृत्युलेख लेखनाची सुप्त प्रेरणा दिसून येते.

एकूणच मृत्युलेखांचे लेखन हे पत्रकाराच्या सामाजिक बांधीलकीच्या भूमिकेतून झालेले असून व्यक्तीबद्दलचा विशाल मानवतावाद, जिव्हाळा, सहानुभूती, प्रेम, व्यक्तिगत संबंध, आस्था ह्या गोष्टी मृत्युलेख लेखनामागील प्रेरणा होत. त्याचप्रमाणे मृत्युलेख हे तत्कालीन भावनातिरेकातून लिहिले गेले असल्याने त्यात साहजिकच झपाटलेपण आले आहे.

मृत्युलेखांचे लेखन अत्र्यांनी अत्यंत मार्मिकतेने आणि रसिकतेने केलेले आहे. ते व्यक्तीचे जसे पराकोटीचे टीकाकार होते तसेच गुणग्राहकही होते. या पार्श्वभूमीवर अत्र्यांनी लिहिलेल्या मृत्युलेखांमध्ये त्यांच्यामधील भावनाप्रधान साहित्यिक असल्याचे दिसून येते. व्यक्तीबद्दलचे रागद्वेष तिच्या मृत्यूनंतर संपवून "कोणत्याही सार्वजनिक पुरुषाचे वाङ्मयीन श्राद्ध पत्रकाराने 'रामरीती' नेच करायला हवे. म्हणूनच 'मृत्युलेख' ही पत्रकाराच्या माणुसकीची आणि लेखनकौशल्याची सर्वात मोठी कसोटी आहे"[12] असे अत्रे म्हणतात. यावरुन त्यांचा मृत्युलेख लेखनविषयक दृष्टिकोन स्पष्ट होतो.

अत्रे आयुष्यभर नानाविध क्षेत्रांमध्ये वावरले. अनेक व्यक्तींशी त्यांचा भल्याबु-या प्रकारे संबंध आला. मात्र जी माणसे अत्र्यांच्या आयुष्यात याना त्या कारणांनी आली त्या माणसांबद्दलचे अत्र्यांचे निरीक्षण सूक्ष्म असल्यामुळे त्या व्यक्तीबद्दल त्यांचे सूक्ष्म चिंतन आहे. त्यामुळे अशा व्यक्तींवर मृत्युलेख लिहित असताना अत्रे केवळ व्यक्तीच्या जीवनातील फक्त जंत्री देऊन थांबत नाहीत तर वास्तवाचे भान असलेल्या आपल्या कल्पनाशक्तीने त्या व्यक्तीचे वैविध्यपूर्ण व वेधक दर्शन घडवतात. त्यामुळे मृत्युलेख ज्या व्यक्तीवर आहे त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे सूक्ष्म चिंतन ही देखील

त्यांच्या मृत्युलेख लेखना मागील प्रेरणा होय. मृत्युलेख' लेखनातील कलानुभव म्हणजे त्या व्यक्तीचे जीवन असल्याने स्वाभाविकपणे मृत्युलेखांची प्रेरणा ही व्यक्ती जीवनाशीच संबंधित असते. अत्र्यांना आपल्या गाडीच्या ड्रायव्हरपासून ते आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या नेत्यांपर्यंत अनेकांची जीवने मृत्युलेख लेखनास प्रेरणादायी वाटली.

थोडक्यात अत्र्यांचे मृत्युलेख लेखन हे ते स्वतः वृत्तपत्रकार असल्यामुळे व्यक्तीच्या निधनाच्या प्रसंगाचे औचित्य राखण्याच्या प्रेरणेतून झाले आहे. मात्र असे असले तरी अत्र्यांनी त्याला 'रतीबा' चे स्वरुप येऊ दिलेले नाही. त्यांची लेखनाची वृत्ती हीच वाङ्मयीन असल्यामुळे हे अग्रलेख त्यांनी रुक्ष होऊ दिले नाहीत. अत्रे आपल्या मृत्युलेखांच्या लेखनाविषयी म्हणतात, " जिवंतपणी ज्यांच्यावर मी प्रखर टीका केली त्यांच्या मृत्युनंतर मी त्यांच्या गुणांची स्तोत्रे कशी गाऊ शकतो ह्याचे कित्येकांना कोडे पडलेले आहे. पण 'हृदय' असल्याखेरीज हे कोडे उलगडणार नाही. मी राजकारणी म्हणजे हृदयशून्य असतो तर जिवंतपणी मी ज्यांच्यावर टीका केली त्यांच्या मरणानंतरही मी त्यांना सडकून शिव्या दिल्या असत्या. ते जास्त सुसंगत दिसले असते. पण मी भावनाप्रधान साहित्यिक असल्याने माझे रागद्वेष आणि मतभेद मरणानंतर संपतात.[13] यावरुन त्यांच्या मृत्युलेख लेखनामागे त्यांच्यामधील भावनाप्रधान साहित्यिक उभा आहे ही गोष्ट स्पष्ट होते.

अत्र्यांनी केलेले मृत्युलेखांचे लेखन बहुतांशी भावनाप्रधान साहित्यिकाच्याच भूमिकेतून केलेले आहे. ज्या व्यक्तीचे निधन झाले त्या व्यक्तीचे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनातील स्थान – तिच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण – त्या व्यक्तीचे आपल्या (अत्र्यांच्या) स्वतःच्या जीवनातील स्थान (व्यक्ती जर संबंधित असेल तर) –आठवणी – तिचा समाजमनावर असणारा प्रभाव – तिच्या कार्याचा विवेचक शोध (वास्तववादी भमिकेतून) आणि शेवटी किंवा आरंभी 'वैयक्तिक हळहळ' अशा प्रकारे मृत्युलेख लिहित असताना व्यक्तीच्या जीवनातील वास्तव घटना, 'संदर्भ, जीवनार्थ, कालसंदर्भ, सामाजिक संदर्भ यांचाही ते विचार करतात. म्हणजे या लेखनामागे सामाजिक, सांस्कृतिक, कालसंदर्भ ह्याही प्रेरणा आहेत हे स्पष्ट होते. या निमित्ताने अत्र्यांची म्हणून स्वतःची सामाजिक, राजकीय विचारसरणी हीदेखील ह्या लेखनामागील प्रेरणा ठरु शकेल.

'मृत्युलेखा' चा संबंध प्रत्यक्ष व्यक्तीशी असल्याने व ती व्यक्ती तिच्या जिवंतपणी समाजाचा घटक असल्याने त्या व्यक्तीचे विचार, जीवनमूल्ये तिच्या निधनानंतर समाजाला समजून देऊन त्या व्यक्तिमत्त्वाचा समाजाला परिचय करुन देणे हीदेखील ह्या लेखनामागील प्रेरणा होय.

या साऱ्या गोष्टी जमण्यासाठी वृत्तपत्रकाराची दृष्टी चौफेर असावी लागते व तो बहुअवधानी असावा लागतो. प्रसंगाचे औचित्य जर साधले गेले नाही तर वाचकांची निराशा होणार असते.

त्यामुळे "परीक्षेचा पेपर लिहिताना विद्यार्थ्यांची जी अवस्था होते, तशी वृत्तपत्र लेखकांची स्थिती असते. बरे, हा पेपर पत्रकाराला रोजच्या रोज किंवा आठवडयाच्या आठवडयाला लिहावा लागतो. त्याला कधी खळच नाही. एक पेपर संपला की दुसरा सुरु......... शिवाय ह्या पेपरात कोणत्या स्वरुपाचा किंवा किती अवघड प्रश्न येईल ह्याला काही सुमारच नाही. पृथ्वीतलावरील यच्चयावत घडामोडींपैकी काय वाटेल तो प्रश्न येण्याची शक्यता असते ह्या प्रश्नांसबंधी तुम्हाला माहिती असो वा नसो, त्याची तयारी करावयाला तुम्हाला सवड मिळो वा न मिळो. कमीत कमी वेळात जास्तीत जास्त चांगले उत्तर तुम्हाला लिहिता आले पाहिजे".[14] असे अत्रे वृत्तपत्रातील लेखनाविषयी जे म्हणतात ते ततोतंत खरे आहे. ह्या परीक्षेत अत्रे बहुतांशी विषयांमध्ये विशेष प्राविण्यातच उत्तीर्ण झाले आहेत असे म्हटल्यास वावगे ठरु नये. त्यामुळे त्यांची चौफेर दृष्टी व बहुअवधानी व्यक्तिमत्वही देखील ह्या लेखनामागील प्रेरणाच होय.

अत्र्यांच्या समकालीन राजकीय, सामाजिक प्रणालींशी त्यांचा संबंध असल्याने व त्यानिमित्ताने अनेक व्यक्तिंबद्दलचे त्यांचे सूक्ष्म चिंतन असल्याने त्या त्या व्यक्ती निवर्तल्यानंतर अत्र्यांनी त्यांच्यावर लिहिलेले मृत्युलेख खास वठले आहेत. मृत्युलेखात मृत व्यक्तीचे जीवन आणि त्याबरोबरीने मृत्युलेखकाराच्या स्तयनिष्ठेसही महत्व असल्याने आणि पर्यायाने ह्या दोन्ही बाबी अत्र्यांच्या जवळ एकवटल्याने त्यांनी लिहिलेले मृत्युलेख नितांत रमणीय झाले आहेत.

अत्रे हे संवेदनशील कलावंत असल्याने ते जीवनाकडे त्याच संवेदनशीलतेने पाहतात. त्यामुळेच फक्त प्रसिद्ध व्यक्तीच त्यांना मृत्युलेख भावल्या नाहीत तर काही सामान्य व्यक्तींचा मृत्युदेखील त्यांच्या मनाला भावला आणि त्यांनी सामान्य व्यक्तींवरही काही असामान्य असे मृत्युलेख लिहिले.

सारांश अत्र्यांचे मृत्युलेख लेखन हे विशेष करुन त्यांच्या 'नवयुग' साप्ताहिकासाठी व 'मराठी' ह्या वृत्तपत्राच्या अग्रलेखांसाठी प्रसंगोपात झालेले आहे. मात्र त्यांच्या मृत्युलेख लेखनामागे कोणतीही एकच एक भूमिका नसून अत्र्यांचे एकूणच जीवन, त्यांचा संवेदनशील स्वभाव, लोकसंग्रह, सामाजिक राजकीय प्रणालींशी असणारा संबंध, प्रासंगिक घटना, प्रसंग, चौफेर दृष्टिकोन, व्यक्तिगत जिव्हाळा अशा अनेक प्रेरणांमधून अत्र्यांनी आपल्या 'नवयुग' व 'मराठा' मधून प्रसंगाचे औचित्य राखून मृत्युलेखांचे लेखन केले आहे.

वरील विवेचनाआधारे आपणास खालील निष्कर्ष काढता येतील.

1. आचार्य अत्र्यांच्या लेखक म्हणून जडण घडणीत त्यांच्या बालपणातील वेगवेगळे प्रसंग संस्कार, त्यांचा खोडकर स्वभाव, खिलाडू वृत्ती, शिक्षकाच्या नोकरीच्या निमित्ताने आलेले अनुभव व वेगवेगळया ठिकाणी भेटलेल्या नानाविध व्यक्ती यांच्यामधून त्यांची लेखक म्हणून जडणघडण झालेली दिसते.

2. अत्र्यांचा हरहुन्नरी स्वभाव, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, अभिरुची संपन्न मनोवृत्तीने जीवनाकडे पाहण्याची दृष्टी, जीवनविषयक स्वीकारात्मक दृष्टिकोन, वाड्.मयीन दृष्टी, कमालीचे हळवेपण व धडाडीचे टीकाकार, जीवनातील कारुण्याबरोबरच जीवनातील नाविन्याचा शोध घेण्याची वृत्ती, या सा–यांचा परिणाम त्यांच्या एकूणच वाड्.मयावर झालेला दिसून येतो.

3. 'योगायोग' हा अत्र्यांच्या जीवनातील' एक भाग असला तरी त्यामागे त्यांचे अफाट कर्तृत्त्व उभे असल्याचे जाणवते. त्यामुळे त्यांच्या जीवनातील सर्वच गोष्टी योगायोगाने झाल्या असे म्हणता येणार नाही.

4. अत्र्यांचे व्यक्तीबद्दलचे सूक्ष्म निरीक्षण, चिंतन, त्यांचा राजकीय, सामाजिक प्रणालींशी असणारा संबंध, व्यक्तिगत जिव्हाळा, प्रेम, सहानुभूती, आस्था व्यक्त करणे ह्या भूमिकेतून हे लेखन झाले आहे.

5. मृत्युलेखांचे लेखन पत्रकाराच्या भूमिकेतून झाले असले तरी अत्र्यांचा मूळ पिंड कारुण्याचा असल्याने त्यांच्या मूळ स्वभाव धर्माचा ठसा त्यांनी लिहलेल्या मृत्युलेखांवर उमटला आहे.

*****

## – तळटीपा –

1. प्र. के. अत्रे : 'मी कसा झालो': पाचवी आवृत्ती : परचुरे मुंबई: 1987 : पृष्ठ 395, 396.
2. प्र. के. अत्रे : 'क–हेचे पाणी खंड 1 : प्रथमावृत्ती : परचुरे, मुंबई : 1963 : पृष्ठ 1.
3. प्र. के. अत्रे : 'मी कसा झालो' : पाचवी आवृत्ती : परचुरे, मुंबई : 1987 : पृष्ठ 24
4. प्र. के. अत्रे : 'क–हेचे पाणी खंड 1 : प्रथमावृत्ती : परचुरे, मुंबई : 1963 : पृष्ठ 90, 91
5. तत्रैव : पृष्ठ 230
6. तत्रैव : पृष्ठ 241
7. तत्रैव : पृष्ठ 301
8. प्र. के. अत्रे : 'मी कसा झालो' पाचवी आवृत्ती : परचुरे, मुंबई : 1987 : पृष्ठ 50
9. प्र. के. अत्रे : 'क–हेचे पाणी खंड 2' प्रथमावृत्ती : परचुरे, मुंबई : 1964 : पृष्ठ 116
10. प्र. के. अत्रे : 'मी कसा झालो' : पाचवी आवृत्ती : परचुरे, मुंबई : 1987 : पृष्ठ 39
11. तत्रैव : पृष्ठ 303
12. तत्रैव : पृष्ठ 334
13. तत्रैव : पृष्ठ 334
14. तत्रैव : 340

–x–